उपस्थित होते. जनक अग्रवाल, कौशिक आगरवाल, उपस्थित होते.

# घोगरे विज्ञान महाविद्यालयाचे २० विद्यार्थी बनले सायबर योद्धा




**धुळे** : डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय, क्विक हील फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर विभाग धुळे यांच्यात झालेल्या करारानुसार पदवी व पदव्युत्तर वर्षातील संगणकशास्त्र विभागातील २० विद्यार्थ्यांची सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत सायबर योद्धा म्हणून निवड करण्यात आली आहे. हे विद्यार्थी शाळा, महाविद्यालयासह समाजात सायबर जागरूकता अभियान राबवणार आहेत.

या निवड प्रक्रियेसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सीएसआर एक्झिक्युटीव्ह गायत्री पवार या उपस्थित होत्या. त्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी लोकांमध्ये सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून द्यायचे आहे. तसेच क्विक हीलच्या वेबसाईटवर असलेल्या महाराष्ट्र सायबर पेजवरील सायबर फ्रॉडचा अभ्यास करून जनमानसात जागृती निर्माण करायची जबाबदारी आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम व्ही. पाटील यांनी महाराष्ट्राच्या ३० महाविद्यालयाची या उपक्रमात निवड झाली असून, या उपक्रमात सहभागी होऊन धुळेकरांना सायबर सुरक्षित करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांनी केले. तसेच संगणकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राकेश देवरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे यांनी सहकार्य केले. विद्यार्थी जयेश गोरे, दिव्येश सोनवणे, पूर्वा पंचारिया, श्रेया विसपुते यांचेही सहकार्य लाभले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आ.कुणाल पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष एस. टी. पाटील यांनी कौतुक केले.